# <u>प्रेस नोट</u>

दि. १९/०५/२०१४

## विषय : पदवीधर शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादी निरंतर पुनरिक्षण कार्यक्रम

मा. भारत निवडणूक आयोगाने दि. ०१/११/२०१३ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघातील मतदार नोंदणी कार्यक्रम घोषित केला होता. त्यास अनुसरुन दि. ०१/०२/२०१४ रोजी शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादयांची अंतीम प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.

तथापी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील कलम २३ (३) नुसार पदवीधर/शिक्षक मतदार संघातील निवडणूकी संदर्भात नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतीम दिनांकापर्यंत मतदार नोंदणी प्रक्रिया चालू राहते. त्यामुळे शिक्षक / पदवीधर मतदारसंघातील मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी झाल्यानंतर देखील मतदार नोंदणी प्रक्रिया निरंतर पुनरिक्षणांतर्गत चालू ठेवणे आवश्यक आहे.

<u>पदवीधर मतदारसंघाकरीता मतदारांना खालील महत्वाच्या बाबी आवश्यक आहेत.</u>

सोलापूर जिल्हयातील सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय तसेच तहसिलदार कार्यालय येथे जे मतदार त्या मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी आहेत आणि ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी किमान ३ वर्ष पदवीधर असेल (दि. ०१/११/२०१० या अर्हता दिनांक) अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्यास पात्र आहे .

पदवीधर मतदारसंघाकरीता मतदाराने फार्म नं. १८ दुबार प्रतित भरुन देणे तसेच निवडणूक ओळखपत्र क्रमांक नमूद करुन सोबत ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. सदरचा फार्म संबंधित मतदाराने जिल्हयातील पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः आणून दयावयाचा आहे. अर्ज गठ्ठा पध्दतीने कोणाकडूनही स्विकारले जाणार नाहीत. पदवीधर मतदारसंघासाठी मतदाराने नमूना फार्म क्र. १८ सोबत त्यांनी पास झालेल्या डिग्री, डिप्लोमा सर्टीफिकेटची / मार्कलिस्ट साक्षांकित प्रत जोडावी. तसेच शासकीय सेवेमध्ये असणा-या कर्मचा-यांचे संबंधित विभागातील कार्यालय प्रमुखाने त्यांचेकडील उपलब्ध असलेल्या रेकॉर्डची प्रत देता येईल. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार जे पदवीधर मतदारांसाठी पात्र आहेत अशाच मतदाराने नमूना १८ चा फार्म भरुन द्यावा. मतदाराने नमूना १८ चा फार्म पदनिर्देशित अधिकारी यांनी त्यांची छाननी केल्यानंतर मूळ सर्टीफिकेट वरुन तपासले व योग्य आहे व मुळ सर्टीफिकेट वरुन तपासले अयोग्य आहे. अशा प्रकारचा शेरा नमूद करतील, जर मतदाराने त्यांचा नमूना १८ चा फार्म पोस्टाने पाठविल्यास उपविभागीय अधिकारी हे संबंधित मतदारास नोटीस पाठवून त्यांच्या समोर व्यक्तीशः उपस्थित

राहणेबाबत तारीख देतील व त्यानुसार मतदाराने उपस्थित राहून त्यांचे मुळ सर्टीफिकेट सादर करावे. जर मतदाराने मुळ सर्टीफिकेट सादर केले नसल्यास त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात येईल.

<u>शिक्षक मतदारसंघाकरीता मतदारांना खालील महत्वाच्या बाबी आवश्यक आहेत.</u>

शिक्षक मतदार संघात नाव नोंदणीसाठी ०१ नोव्हेंबर २०१३ पुर्वी सलग ६ वर्षापैकी किमान ३ वर्ष शिक्षकाचे पुर्णवेळ काम करणारी व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव नोंदणीस पात्र असेल. तथापी अर्धवेळ सेवेतील शिक्षक पात्र असणार नाहीत. मतदार हा सर्वसाधारणपणे त्याच शिक्षक मतदारसंघातील रहीवासी असावा. शिक्षक मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाने विहीत केलेला नमूना क्र. १९ हा फार्म भरुन देणे आवश्यक आहे. निवडणूक ओळखपत्र क्रमांक नमूद करुन सोबत निवडणूक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. फार्मसोबत संबधित शिक्षकांच्या सेवेच्या तपशिलाकरीता संस्था प्रमुखांचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. या अंतर्गत संबंधित शिक्षक हा माध्यमिक शाळेचा कर्मचारी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत संस्थेचे मुळ प्रमाणपत्र व पदवी प्रमाणपत्राची प्रत तपासणीस देणे आवश्यक आहे. शिक्षक मतदारसंघाकरीता फार्म नं. १९ सोबत भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या फार्म मध्ये प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. शिक्षक मतदारसंघातील अर्ज गठ्ठा पध्दतीने स्विकारले जाणार नाहीत. सदर निवडणूकीसाठी पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या यादया तयार करण्याच्या कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा निवडणूक कार्यालय, उपविभागीय कार्यालय व तहसिलदार कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा.

तरी ज्या मतदारांनी अद्यापी मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ केले नाही अशा मतदारांनी त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणेकामी अर्ज सादर करावा असे आवाहन जिल्हाधिकारी सोलापूर यांनी केले आहे.